“महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक त्रिसदस्यीय प्रभाग रचनेनुसार (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) सुधारणा आदेश, २०२२”

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र. २१ /का-५
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २२ जुलै, २०२२

## आ दे श

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता त्रिसदस्यीय प्रभाग रचनेनुसार सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण निश्चित करण्याकरिता समक्रमांकाच्या दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशान्वये सविस्तर कार्यपध्दती विहित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक-६/२०२१, दि. १/१०/२०२१ :- या अन्वये महानगरपालिकेमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या एकूण जागांच्या संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असेल, मात्र एकूण आरक्षण महानगरपालिकेच्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा आशयाची तरतूद केली. मात्र सदर सुधारणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामधील रिट याचिका क्र. ८४१ / २०२१, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६ / २०२१ व रिट याचिका क्र. १३१६ / २०२१ मध्ये दि. १५/१२/२०२१ रोजी झालेल्या निर्णयास अनुसरुन जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करून त्याबाबत तरतूद करत नाही तोपर्यंत आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन निवडणुका घ्याव्या लागतील असे आदेशित केले होते. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ४.२ व परिच्छेद क्र. १० मध्ये

सद्यस्थितीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता कोणत्याही जागा देय होणार नाही अशी तरतूद केली होती आणि या तरतुदीच्या अनुषंगाने सदर आदेशातील परिच्छेद क्र. ११ मध्ये देखील सर्वसाधारण महिलांच्या जागा वाटप करण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती विहित केली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दि. ७ जुलै, २०२२ रोजी त्यांचा अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या उपरोक्त आदेशास अनुसरुन महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती तरतूद करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी,** मी, यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून त्याअंतर्गत महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्य संख्या ठरविणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. **संक्षिप्त नाव:**

या आदेशाला " **महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणूक त्रिसदस्यीय प्रभाग रचनेनुसार (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) सुधारणा आदेश, २०२२** " असे संबोधिले जाईल.

२. दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. ४.२ च्या उपपरिच्छेदा ऐवजी खालील उपपरिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"समर्पित मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार प्रत्येक महानगरपालिकेत त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील. मात्र महाराष्ट्र अधिनियम क्र. २०/२०२२ नुसार जर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्या आरक्षणाचे एकूण प्रमाण हे एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक होत असेल तर एकूण आरक्षित जागा ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात येतील. "

३. दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. १० ऐवजी खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"१०. **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे :-** समर्पित मागासंवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार प्रत्येक महानगरपालिकेत त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील. मात्र महाराष्ट्र अधिनियम क्र. २०/२०२२ नुसार जर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्या आरक्षणाचे एकूण प्रमाण हे एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक होत असेल तर एकूण आरक्षित जागा ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात येतील. "

४. दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. ११ ऐवजी खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"११. **महिलांचे (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातील महिलांसह) आरक्षित प्रभाग निश्चित करणे :-** शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या **महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१** च्या, नियम क्र. ७ मध्ये अनुसूचित जाती महिला,

अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला यांचे वाटप करण्याची पध्दत विहित केलेली आहे. त्यानुसार सदर प्रवर्गातील महिलांच्या जागांचे वाटप संबंधित प्रभागात करण्यात येईल."

५. दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. १३ मधील शिर्षक व परिच्छेद क्र. १३.१, १४.५ मध्ये "(अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसह)" या ऐवजी "(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह)" असे समाविष्ट करण्यात येत आहे.

वरील सुधारणांना अनुसरुन दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशासोबतचे परिशिष्ट-१ यासोबत जोडल्यानुसार अंशत: सुधारित करण्यात येत आहे. समर्पित मागासवर्ग आयोगाने महानगरपालिकांबाबत निश्चित केलेली नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय जागांची टक्केवारी विचारात घेऊन प्रत्येक महानगरपालिकेस त्यांच्या वाढीव सदस्य संख्येनुसार देय होणाऱ्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये दर्शविल्या आहेत.

( यु. पी. एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र

सहपत्र :-
परिशिष्ट १ व २

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई वगळून)
५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.

## परिशिष्ट - १

### (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना)

-------------- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ---------(सन)

९. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$( \text{सूत्र} = \frac{\text{समर्पित मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेली टक्केवारी}}{100} \times \text{महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या} )$$

टीप :- अ.क्र. ९ येथे नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची गणना करताना जेथे समर्पित आयोगाने २७ % इतक्या आरक्षणाची शिफारस केली आहे. त्या ठिकाणी जागांची गणना करताना अपूर्णांक वगळण्यात यावा.

१०.अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा -

$$( \text{सूत्र} = \frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{2} )$$

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१.अनुसूचित जातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

२. अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

३. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

४. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

( सूत्र = अ.क्र. १० (अ) - [ अ.क्र.१० (ब१) + १० (ब२)+ १० (ब३)] )

**टीप** :- स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

११. अराखीव -

( सूत्र = अ.क्र. ४ - [ अ.क्र.७ + अ.क्र.८ + अ.क्र.९+ १० ( ब ४ )] )

सही

आयुक्त, ...............

महानगरपालिका

परिशिष्ट - 2

# CORPORATION TOTAL POPULATION, SEATS & WARDS DETAILS - ELECTION 2022-23

| SR.NO. | NAME OF THE CORPORATION | TOTAL POPULATION | | | TOTAL SEATS | | GENERAL | | TOTAL SC | | TOTAL ST | | BCC | TOTAL BCC | | TOTAL WARD | 3 MEM | 2 MEM | 4 MEM |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | TOTAL | S.C. | S.T. | TOTAL | WOMEN | TOTAL | GENERAL WOMEN | SC | SC WOMEN | ST | ST WOMEN | COMM REC. % | BCC | BCC WOMEN | | | | |
| 1 | AURANGABAD | 1228032 | 238105 | 16320 | 126 | 63 | 66 | 33 | 24 | 12 | 2 | 1 | 27 | 34 | 17 | 42 | 42 | | |
| 2 | NAVI MUMBAI | 1120547 | 100067 | 18913 | 122 | 61 | 84 | 41 | 11 | 6 | 2 | 1 | 20.5 | 25 | 13 | 41 | 40 | 1 | |
| 3 | VASAI-VIRAR | 1234690 | 51468 | 58608 | 126 | 63 | 81 | 40 | 5 | 3 | 6 | 3 | 27 | 34 | 17 | 42 | 42 | | |
| 4 | KOLHAPUR | 549236 | 72005 | 2989 | 92 | 46 | 57 | 28 | 12 | 6 | 1 | 1 | 23.9 | 22 | 11 | 31 | 30 | 1 | |
| 5 | KALYAN DOMBIVALI | 1518762 | 150171 | 42584 | 133 | 67 | 81 | 40 | 13 | 7 | 4 | 2 | 27 | 35 | 18 | 44 | 43 | | 1 |
| 6 | BMC | 12442373 | 803236 | 129653 | 236 | 118 | 156 | 77 | 15 | 8 | 2 | 1 | 27 | 63 | 32 | | | | |
| 7 | THANE | 1841488 | 126003 | 42698 | 142 | 71 | 114 | 56 | 10 | 5 | 3 | 2 | 10.4 | 15 | 8 | 47 | 46 | | 1 |
| 8 | ULHASNAGAR | 506098 | 86680 | 6576 | 89 | 45 | 49 | 24 | 15 | 8 | 1 | 1 | 27 | 24 | 12 | 30 | 29 | 1 | |
| 9 | NASHIK | 1486053 | 214620 | 107456 | 133 | 67 | 69 | 34 | 19 | 10 | 10 | 5 | 27 | 35 | 18 | 44 | 43 | | 1 |
| 10 | PUNE | 3556824 | 480017 | 41561 | 173 | 87 | 102 | 51 | 23 | 12 | 2 | 1 | 27 | 46 | 23 | 58 | 57 | 1 | |
| 11 | PIMPRI CHINCHWAD | 1727692 | 273810 | 36535 | 139 | 70 | 77 | 38 | 22 | 11 | 3 | 2 | 27 | 37 | 19 | 46 | 45 | | 1 |
| 12 | SOLAPUR | 951558 | 138078 | 17982 | 113 | 57 | 65 | 33 | 16 | 8 | 2 | 1 | 27 | 30 | 15 | 38 | 37 | 1 | |
| 13 | AKOLA | 536540 | 90942 | 11574 | 91 | 46 | 50 | 25 | 15 | 8 | 2 | 1 | 27 | 24 | 12 | 30 | 29 | | 1 |
| 14 | AMRAVATI | 647057 | 111435 | 15955 | 98 | 49 | 53 | 26 | 17 | 9 | 2 | 1 | 27 | 26 | 13 | 33 | 32 | 1 | |
| 15 | NAGPUR | 2447494 | 480759 | 188444 | 156 | 78 | 78 | 38 | 31 | 16 | 12 | 6 | 22.7 | 35 | 18 | 52 | 52 | | |
| 16 | CHANDRAPUR | 320379 | 61164 | 25794 | 77 | 39 | 39 | 19 | 15 | 8 | 6 | 3 | 22.9 | 17 | 9 | 26 | 25 | 1 | |
| 17 | LATUR | 382940 | 67474 | 5550 | 81 | 41 | 45 | 23 | 14 | 7 | 1 | 0 | 27 | 21 | 11 | 27 | 27 | | |
| 18 | PARBHANI | 307170 | 37667 | 3632 | 76 | 38 | 52 | 25 | 9 | 5 | 1 | 1 | 17.9 | 14 | 7 | 25 | 24 | | 1 |
| 19 | BHIVANDI NIJAMPUR | 709665 | 21820 | 8178 | 101 | 51 | 70 | 35 | 3 | 2 | 1 | 0 | 27 | 27 | 14 | 34 | 33 | 1 | |
| 20 | MALEGAON | 590998 | 25641 | 12284 | 95 | 48 | 64 | 32 | 4 | 2 | 2 | 1 | 27 | 25 | 13 | 32 | 31 | 1 | |
| 21 | PANVEL | 509901 | 37923 | 12727 | 89 | 45 | 58 | 29 | 7 | 4 | 2 | 1 | 25.2 | 22 | 11 | 30 | 29 | 1 | |
| 22 | MIRA-BHAYANDER | 809378 | 30243 | 12596 | 106 | 53 | 80 | 40 | 4 | 2 | 2 | 1 | 18.4 | 20 | 10 | 35 | 34 | | 1 |
| 23 | NANDED WAGLA | 550439 | 102677 | 12738 | 92 | 46 | 49 | 24 | 17 | 9 | 2 | 1 | 27 | 24 | 12 | 31 | 30 | 1 | |